माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक :- २०१९/२०१९**

**अपिलार्थी :- श्री. पांडुरंग पुंजाजी धोतरकर,**
**उदासी वार्ड, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**बांधकाम विभाग, नगर परिषद पुसद, जि. यवतमाळ**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक :- १२.०९.२०२५**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या पत्राचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०१८ | १५.०५.२०२५ | १४.१२.२०१८ | ३०.०४.२०१९ |

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये **जोडपत्र 'क'** या नमुन्यात आयोगाचे स्तरावर द्वितीय अपील अर्ज दिनांक २६.०७.२०१९ रोजी दाखल केला. सदर अपील दाखल करण्याच्या प्रयोजनामध्ये "माहिती न प्राप्त झाला नसलेमुळे", असे नमूद केले आहे.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.पांडुरंग पुंजाजी धोतरकर, अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, यांचे तर्फे श्री. मकरंद लोखंडे, रचना सहायक उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नूसार अपीलार्थी यांनी **जोडपत्र - अ** या नमुन्यात जन माहिती अधिकारी यांचेकडे रीतसर अर्ज दाखल करुन त्यामध्ये " १. पुसद शहरात शासकीय भुखंड किती आहे त्यापैकी किती भुखंडावर अतिक्रमण आहे २. दिपक सखाराम उत्तरवार यांनी नझूल सिट नंबर ५० प्लाट नंबर ११७६ वर बिना परवाना बांधकाम करूण केलेल्या अतिक्रमणाबाबत नगर परिषद ने दाखल केलेल्या फौजदारी गुन्हयात त्याचे अतिक्रमण पाडणेबाबत हुकुम अथवा पाडू नये याकरीता मनाई हुकुम दिली असल्यास त्याची सत्यप्रत मिळावी. ३. पांडुरंग पुंजाजी धोतरकर यांचे २ ते ३ फुट अतिक्रमण काढण्यात आले परंतु श्री. उत्तरवार यांचे नगरपरिषदच्या नालीवर ९०० फुट अतिक्रमण केले आहे. त्यामुळे उदासी वार्ड मधील पुरूष व महिला, लहान मुले, मुली घाणपाणीमुळे डेंग्युची साथ वाढतच चालली असून ताप आल्याने आई वडिलानी रक्त चाचणी केली असता त्यात डेंग्यु झाल्याचे आढळून येते आहे." इ. माहिती मागितली होती.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) नूसार दाखल झालेला अर्ज जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) मधील तरतूदीनूसार अर्ज प्राप्त झाल्यापासून आगामी ३० दिवसात निकाली काढणे बंधनकारक आहे.

मात्र अपिलार्थीला अभिप्रेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून दिनांक १४.१२.२०१८ रोजी कलम १९ (१) नुसार **जोडपत्र-ब** मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन त्याच्या कारणामध्ये *"पुसद नगर परिषद याने अतिक्रमण काढले किंवा नाही याची माहिती देणे"* असे नमूद केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.०४.२०१९ रोजी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन असे आदेश पारीत केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या अपिलांचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार अद्याप पावेतो माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे माहिती अधिका अधिनियम २००५ चे कलम ७ (१) चा भंग झाल्याचा दिसून येते. यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे भंग होणार नाही याची सक्त ताकिद देण्यात येते. माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती ०७ दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी. सदर सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते

सदर प्रकरणामध्ये दिनांक १०.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१५.०५.२०२५ रोजी माहिती पुरविण्यात आली असे सांगितले होते. तसेच सदर प्रकरणामध्ये विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गिरीश डुब्बेवार व श्री. रमेश वाघमारे यांचा कालावधी व त्यांचा पत्ता दि. १२.०९.२५ रोजी आयोगास कळविण्यात यावा, असे निर्देश दिले होते.

आज सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतीनीधी श्री. मकरंद लोखंडे, रचना सहायक उपस्थित असून त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गिरीश डुब्बेवार व श्री. रमेश वाघमारे यांच्या कालावधीबाबतची कागदपत्रे सादर केली आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर व मागील सर्व सुनावणीच्या वेळीचा युक्तिवाद विचारात घेऊन आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार माहिती पुरविलेली नव्हती. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रदिर्घ विलंबाने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**अंतरिम आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गिरीश डुब्बेवार व श्री. रमेश वाघमारे यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या

वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधीत सर्व तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना या आदेशाची प्रत बजावून त्याचा अनुपालन अहवाल पुढील सुनावणीचे वेळी सादर करावा.

३. पुढील सुनावणी दि. ०१.१०.२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

**सही/-**

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १२.०९.२०२५**

जावक क्रमांक ५८८१ दिनांक २२.०९.२०२५

**अपील क्रमांक :- २०१९/२०१९**

**अपीलार्थी, श्री. पांडुरंग पुंजाजी धोतरकर.**

**सुनावणी दिनांक ०१.१०.२०२५(In Continuation of Order dt.१२.०९.२०२५)**

वरील पारित आदेशाचे अनुपालनासाठी सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०१.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रमेश उमाजी वाघमारे (से.नि.) उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी गैरहजर आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गिरीश डुब्बेवार गैरहजर आहेत.

**विवेचन**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.वाघमारे (से.नि.) यांनी सांगितले की, त्यांचा ४ ते ५ महिन्याचा कालावधी होता. व श्री.गिरीश डुब्बेवार हे नगर अभियंता श्रेणी 'ब' म्हणून त्यांच्या पुर्वी कार्यरत होते व त्यांच्या बदलीनंतर सुध्दा त्याठिकाणी कार्यरत होते. त्यांनी पुढे असे ही म्हटले की, श्री.डुब्बेवार यांनी त्यांना प्रभार सुध्दा दिला नाही तसेच संचिका सुध्दा दिल्या नाहीत. श्री.वाघमारे हे श्रेणी 'अ' चे अभियंता होते.

एकूणच या प्रकरणी श्री.गिरीश डुब्बेवार हे जबाबदार असल्याचे दिसून येते. तथापि, ते आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान मुख्याधिकारी देखील अनुपस्थित आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नुसार पारित केलेले आदेश संबंधीत प्राधिकरणावर कलम १९ (७) नूसार बंधनकारक आहेत. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीश डुब्बेवार व विद्यमान मुख्याधिकारी यांनी पारित आदेशानुसार कार्यवाही तर केलीच नाही परंतु ते विनापरवानगीने आजच्या सुनावणीस अनुपस्थित

राहिले आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून आयोग याबाबत तिव्र नाराजी व्यक्त करित आहे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीश डुब्बेवार यांना शास्ती का करु नये याबाबतचा खुलासा सादर करण्याची अंतिम संधी प्रदान करण्यात येते. त्यांनी यापुर्वी आयोगाने दि.१२.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार खुलासा पुढील सुनावणीचे वेळी व्यक्तीशः उपस्थित राहून आयोगासमक्ष सादर करावा.

२. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी आयोगाने यापुर्वी दि.१२.०९.२०२५ रोजीच्या पारित आदेशातील अनु.क्र. २ नूसार अनुपालन अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगासमक्ष सादर करावा.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीश डुब्बेवार व विद्यमान मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद हे आजच्या सुनावणीस आयोगाच्या परवानगी शिवाय अनुपस्थित राहिले आहेत. म्हणून त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. दि.०१.१२.२०१५ नूसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये याबबातचा स्वयंस्पष्ट व लेखी खुलासा पुढील सुनावणीचे वेळी आयोगासमक्ष व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा.

४. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २७.१०.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

Thakare

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०१.१०.२०२५**

जावक क्रमांक ६०५० दिनांक 0 1 OCT 2025